वन विभाग

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय

O/o Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State

Phone No.- 0712-2560953
E-mail - pccfwlngp@mahaforest.gov.in
Website – www.mahaforest.gov.in

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य,
Additional Principal Chief Conservator of Forest (Wildlife) Maharashtra State.
"Van Bhavan", 3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur – 440 001.

पत्र-ई मेल क्रमांक :-कक्ष-२३(२)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.१६३/4366/२०२४-२५ दिनांक २८ /११/२०२४

प्रति,

JSW Energy PSP Two Limited,
JSW Centre, Bandra Kurla Complex,
Bandra East, Mumbai-400051.
Email- lalit.bora@jsw.in

विषय :- Request for issuance of "Certificate and Certified map" mentioning that the project boundry is located outside the ESZ/WLS and no Tiger/Elephant Corridor/Critical polluted area falls in 10 kms of the proposed Bhavali Pumped Storage Project (1500 MW) Nashik and Thane Districts, Maharashtra.

संदर्भ :- १. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, (Impact Assessment Division), नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र. J-१२०११/०८/२०२२-IA.I (R) दिनांक २७/०६/२०२२ रोजीचे पत्र.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र. कक्ष-३/जमीन/ FCA/ प्र.क्र.१२०/६२६/२०२४-२५, दिनांक १४/११/२०२४.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र. कक्ष-३/जमीन/ FCA/ प्र.क्र.१२०/ ६३६/२०२४-२५, दिनांक १८/११/२०२४.

विषयांकित प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, केंद्र शासनाने सदर प्रस्तावाचे अनुषंगाने संदर्भ पत्र-१ अन्वये A. Environmental Management and Biodiversity Conservation मधील अनु क्र. vi वर खालीलप्रमाणे अट घालून दिलेली आहे.

*vi. Certificate and certified map from Chief Wildlife Warden shall be submitted mentioning that project boundary is located outside the Eco-Sensitive Zone (ESZ)/ Wildlife Sanctuary and no Tiger/elephant corridor /critically polluted area falls within 10 km. of Project site.*

वरील अट क्रमांक vi नूसार प्रस्तावित प्रकल्प क्षेत्राचे हद्दीपासून २.२१ कि.मी. अंतरावर कळसूबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव अभयारण्य आहे. तसेच सदर अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रापासून प्रकल्प

क्षेत्राच्या हद्दीचे अंतर १२.५ मी. आहे. उपरोक्त संदर्भिय पत्र-३ अन्वये प्राप्त झालेल्या अहवालानूसार उपवनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक यांनी सदर प्रकल्प क्षेत्र व परिसर हे राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) च्या संकेत स्थळावर असलेल्या निर्णय समर्थन प्रणाली (DSS) वर तपासणी करून सदर क्षेत्र व्याघ्र भ्रमण मार्गाचा भाग नसल्याचे कळविले आहे. तसेच सदर क्षेत्र हत्ती भ्रमण मार्ग देखील नसल्याचे या कार्यालयास कळविले आहे.

प्रकरणी संदर्भिय पत्र-२ अन्वये प्राप्त झालेला **नकाशा मुख्य वन्यजीव रक्षक, तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य यांचेकडून सांक्षाकन करून यासोबत सहपत्रीत करण्यात येत आहे.** तसेच सदरचा प्रकल्प हा Hydro Project या प्रकारातला असल्यामुळे तसेच सदरचे क्षेत्र कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव अभयारण्याचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्रापासून १२.५ मी. अतंरावर येत असल्यामुळे, आपलेकडून वन्यजीव संवर्धन आराखडा मागविण्यात आलेला होता.

त्यानूसार उपरोक्त संदर्भिय पत्र-२ अन्वये वन्यजीव संवर्धन आणि जैवविविधता व्यवस्थापन आराखडा या कार्यालयाचे मान्यतेसाठी सादर केलेला आहे. प्रकल्प यंत्रणेने एकुण रू. ३१५.०५ लक्ष आर्थिक तरतुद आराखड्यामध्ये केलेली होती. त्यामध्ये या कार्यालयाचे स्तरावरून आवश्यक बदल करून सुधारीत रु. ३२६.५० लक्ष रक्कमेचा आराखडा खालील तपशिलानूसार दिलेले आहे. त्याबाबत आवश्यक कार्यवाही आपले स्तरावरून करण्यात यावी.

**Cost of Wildlife and Biodiversity Management Plan**

| Sr. No. | Activities | Amount (in rs. Lakhs) |
|---|---|---|
| 1. | Removal of invasive alien species and planting palatable species grass | 20.00 |
| 2. | Raising tall plants in mukne nursery | 25.00 |
| 3. | Raising RET tall plants | 15.00 |
| 4. | Planting tall trees of Umber in secure area of army/ defence forces | 50.00 |
| 5. | Making and throwing seedballs | 10.00 |
| 6. | Developing school nurseries | 10.00 |
| 7. | Collection and production of grass seedling at chandani research plots | 20.00 |
| 8. | Distribution of free fruit trees to farmer through SFD | 10.00 |
| 9. | Artificial breeding and rearing of grassland birds like Jungle fowl, quails, partridges etc. | 15.00 |
| 10. | Removal of Ipomea/ water hyacinth in water bodies like Nandur Madhameshwar etc. | 10.00 |
| 11. | Cost of providing patrolling vehicle | 28.50 |
| 12. | Training of staff/ capacity building for HWC and ornithology (Territorial/Wildlife/Social Forestry) | 5.00 |
| 13. | Vulture Conservation (Dycf Nashik) | 10.00 |
| 14. | Research of inland aquatic bodies and their conservation (Dycf Wildlife Nashik) | 12.00 |

| | | |
|---|---|---|
| 15. | Conservation of wolf/ fox including maintance of their lair | 10.00 |
| 16. | Development of Grass lands/ pastures | 50.00 |
| 17. | Awareness about Wildlife issues in children through चला जावूया वनाला | 5.00 |
| 18. | Survey & Monitoring of implementation by CWLW office M.S. | 5.00 |
| 19. | Implementing measures to conserve rare flower species on the plateau inside Wildlife Sanctuary. | 5.00 |
| 20. | Providing and fencing solar water pump for water hole with borewell in Bhorgad Conservation Reserve | 5.00 |
| 21. | Providing cage to rescue injured animal/ birds in Mamdapur Conservation Reserve | 6.00 |
| | **Total cost** | **326.50** |

**वरील रू. ३२६.५० लक्ष रक्कम असलेला वन्यजीव संवर्धन आणि जैवविविधता व्यवस्थापन आराखडा वन्यजीव व्यवस्थापनाच्या दृष्टीने पोषक स्वरूपाचा असल्यामूळे, त्यांस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**सहपत्र :- वरीलप्रमाणे.**

**(विवेक खांडेकर)**
मुख्य वन्यजीव रक्षक तथा
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
महाराष्ट्र राज्य

प्रतिलिपी : अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी : उपवनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक यांना माहितीस व आवश्यक पुढील कार्यवाहीस अग्रेषित. आपणांस कळविण्यात येते की, या कार्यालयाचे स्तरावरून आराखड्यामध्ये बदल केलेला आहे. त्यानूसार आपले स्तरावरून आवश्यक कार्यवाही करून, आराखड्याबाबतचा पूर्तता अहवाल या कार्यालयास विहित मार्गाने सादर करावे.